ई साहित्य प्रकाशन
वर्ष : दूसरे , अंक : २५
दिनांक : ३०.०८.२०१०

# इंद्रधनुष्य

संपादक -
स्वप्ना कोल्हे (नाशिक)

सहसंपादक -
सोनाली घाटपांडे (पुणे)
भारती सरमळकर (मुंबई)
सचिन काकडे (मुंबई)

अतिथी संपादक –
वैभव भागवत (चंद्रपूर)

हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी.. netaksharee@gmail.com

## अतिथी संपादकाच्या लेखणीतून..

पाऊस म्हणजे माझ्यासाठी आनंदाचा झुला.इंद्रधनुष्य असलेलं असं आभाळ ज्याच्या २ चांदण्यांवर मला दोर टाकून मनसोक्त झुलता येतं.पावसासोबतचं माझं नातं खुप गहिरं आहे.करड्या कथ्थई ढगासोबत,रंग भरलेल्या नजरेने बघणाऱ्या निसर्गासोबत,प्रत्येक क्षणी कुशी बदलणाऱ्या आयुष्यासोबत.पाऊस आणि कविता ह्यांचं नातं गहिरं,दाट,घट्ट आणि गुलाबी असतं.एखादी नवयौवना पावसात नागमोडी चालली की,पावसाला नवं संगीत सुचतं आणि कवीला नवं गाणं.याच वयापासून सुरु होतं पावसाचं गुलाबी गुलाबी होणं आणि सर्व विषय बाजूला सारुन कविता लिहल्या जातात फक्त ह्या गुलाबी पावसावरच.

पाऊस आणि माझी तर लंगोटी यारी आहे.म्हणून मी माझ्या लहानपणीच्या पावसाच्या आठवणी सांगतो.तर ही यारी दोस्ती अगदी त्या वयापासून ज्या वयात शर्ट काढून पावसात मनमुराद नाचता यायचं.मला अजूनही आठवतं,घरी असतांना पावसात भिजतांना कपड्यांवर उडालेली चिखल माती,मित्रांचा पाय ओढून लुटूपुटूची हाणामारी करत चिखलात धडपडणं आणि ह्या साऱ्या प्रकारामुळे वैतागलेली आई.रागावून तिचं, ‘देऊ का एक धपाटा ? हे चिखलाचे डाग आता कसे निघतील ?’असं म्हणून वैतागणं आणि घरात गेल्यावर मात्र गरमागरम कांदा भजी खाऊ घालणं.अहाहा! तोंडाला अगदी पाणी सुटलं यार आणि डोळ्यांतही पाऊस जमा झाला....शाळेत असतांना जर बाहेर पाऊस आला तर वर्गाच्या खिडकीतून बाकावर पडलेल्या गार बर्फाळ गारा शिक्षकांच्या नकळत वेचणं आणि त्या मित्रांच्या शर्टात कोंबणं..कित्ती निरागस अन निखळ आनंद होत्या त्या गोष्टींत..कुठे दडी मारली यार त्या पावसाने ?आणि त्या मित्रांनीही ?

मी ६-७ वर्षांचा असतांना आज पाऊस पडेल,उद्या पडेल म्हणून ढगांकडे जीवघेण्या नजरेने बघायचो.मग ढग गहिवरायचे.आभाळाच्या जमिनीवरुन काळे करडे ढग तुडूंब पाण्याने भरून धावायचे.मागे मी धावायचो.जमिनीवरुन आकाशाकडे पहात.आणि,मग रंगपंचमीला सारे रंग ओतून कुणी जसे मला भिजवावे तसे मला तो भिजवायचा.

कधी कधी पाऊस पडायचाच नाही.पांढरे राखाडी ढग नुसते आपले चेहरे दाखवून लपंडाव खेळायचे.मग मला त्यांचा राग यायचा.वाटायचं,एखाद्या पांढऱ्या ढगाला बादलीत बुडवावं,इतकं की तो रागानं काळाठिक्कर होईल मग त्याला कापसासारखी फुंकर घालून उडवून द्यावं आणि मग तो माझ्यावर बरसेलच ( रागाने का होईना )पण भीतीपण वाटायची,जर त्याने चिडून माझ्या अंगावर वीज पाडली तर ?

पण ही भिती क्षणिक असायची,मला नक्की माहिती असायचं की पाऊस बरसल्यावर तो झाडाच्या पानां-फुलांत,फांद्यांत दडून बसतो.मग मी शक्य असेल त्या झाडांना गदादगा हलवायचो आणि झाडांवरुन पडणाऱ्या जलथेंबांत ‘पाऊस आला,पाऊस आला’ म्हणत मनसोक्त नाचायचो.अंगणात नद्या साचल्या की टिपूर टापुर डुबूक डाबुक,नावेवर बेडूक म्हणत पाण्यात सोडलेली कागदी नाव कुठपर्यंत जाते हे शोधायचो.अद्यापही त्या कागदी नावांचा प्रवास चालू आहे.मला खात्री आहे.

१३-१४ वर्षांचा झाल्यावर मला फुलपाखरांपेक्षा इंद्रधनुष्य अधिक आकर्षक वाटायला लागले.माझ्या मनात अशी शंका यायची की ,हे सारे रंग फुलपाखरांना इंद्रधनुष्याच्या वरदानाने तर मिळत नसतील ना ?वाटायचं,मला इंद्रधनुष्याचं शेपूट पकडून उडता आलं तर..इंद्रधनुष्याला आठवा,नववा,दहावा रंग का नाही ? मग मी चित्रवहीत काढलेल्या इंद्रधनुष्याला दहा रंग द्यायचो,कधी कधी त्याहून जास्त.

मी तेव्हा अकरावीला गेलेलो.कॉलेज सुरु झालेले.मस्त पावसाळा होता.बस स्टॉपवर पावसात भिजलेली एक मुलगी तिच्या मैत्रिणीसोबत माझ्याजवळच येऊन उभी राहिली.उंचीने माझ्या एवढीच,बहुतेक माझ्याच वयाची असेल.नखशिखांत भिजलेली.ढगांचा कडकडाट होत होता,विजा चमकत होत्या.ती काय बोलत होती ? ढग कडाडताहेत की नाही ? मला काही सुध्दा कळत नव्हते.मी हाच विचार करत होतो की,ही जास्त ओली की पाऊस ?

तर मुद्दा असा की,कुणाकुणाकडे गाड्या आलेल्या,माझ्याकडे सायकलच का ? हा प्रश्न माझ्या मनात आला नाही.त्यादिवशी पाऊस होता.वर्गाच्या बाकावर हळूहळू उड्या मारत काही सरी माझ्यापर्यंत पोहचल्या.लेक्चर चालू होते.पण,मॅडमलाही काही मनापासून विद्यार्थ्यांना शिकवायचे दिसत नव्हते.त्यांचे लक्ष नाही असे बघून मी हळूच शेवटच्या बाकावर पोहचतो.हनुवटीवर हात टेकवून मी पाऊस निरखत राहतो.पावसाचा आवाज कुणा अल्लड मुलीच्या पैंजणांसारखा तर नाही ना ?मी असा विचारमग्न असतांनाच vaibhav,solve the problems , don't watch rain....still kid huh? असं मॅडम विचारतात.

कधीकधी पाऊस खुप रडतो.माझ्याकडे ना छत्री असते ना रेनकोट.रस्त्यावरून पाणी वाहत असते.सायकल चालवता येत नाही,मग माझ्या दोन पायांनी एखाद्या नावेला नदीतून काढावे तसे मी सायकल काढतो.मग सिंदबादला जसं एखादं नवा देश भेटल्यावर आनंद झाला असेल तसेच आनंद मला माझ्या घरी पोहचल्यावर झाला होता.जावेद अख्तर साहेबांना ही गोष्ट माहीत असती तर त्यांनी सिंदबाद सेलर गाणं खुप आधी लिहलं असतं.माझ्यावरही बहुतेक.

तर त्यानंतरची खुप सारी वर्ष उडून गेली.कुणी कुठं गेलं तर कुणी कुठे.मी फारसा कुठेही जाऊ शकलो नाही.खिडकीवर बिलगलेला पाऊस डोळयांच्या काचेवरुनही पुसावा लागला.पण तरीही कधी चुकून पावसावर पाय पडला आणि एखादा बुडबुडा तयार झाला की त्यात सारं आकाश दिसतयं का ? त्या निरागसतेने मी बघतो.छत्रीच्या बाहेरच्या तारेच्या टोकाचं बोट पकडून झुलणाऱ्या थेंबांमधून जग कसं दिसतं हे अजूनही बघतो.कुणालाही काही कळत नाही.मला आता खुप सारी प्रॉब्लेम्स सोडवायची आहेत.आता मी लहान नाही.पण पाऊस आजही माझ्यासाठी आनंदाचा झुला आहे.असं आभाळ ज्याच्या २ चांदण्यांवर मला दोर टाकून झुलता येतं.

जर निसर्ग एक गीत असेल तर पाऊस त्याचे स्वर-ताल,संगीत.आभाळामधून चंदेरी तार सोडून थेंब एखाद्या रोलरकोस्टर वरुन घसरावे तसे जमिनीवर उसळतात आणि नभ धरेमधलं सारं अंतर मिटून जातं.मोठ्ठ्या घनदाट झाडांवर इंद्रदेवाचा कुंचला फिरतो आणि ते अधिक गडद हिरवे होतात.इवल्याशा गवतालाही ह्यातून वगळले जात नाही.गुलाबी गुलाबाचे रंग अधिक सतेज होतात.कोरड्या तलावांवर पाण्याच्या चादरी ओढल्या जातात.त्यावर मग मुलं लोळतात,पोहतात अगदी घरात जसं अंथरुणावर लोळावं ना अगदी तस्सं.नदी पावसाने भरत असते,भिजत असते अगदी ओली चिंब.तिला थंडी लागू नये म्हणून हिरव्या शेवाळाची शाल निसर्ग अगदी एखाद्या आईच्या मायेने ओढून देतो.झाडाची हिरवी किनार निळया आभाळाबरोबर नदीत सांडत असते,आणि सात रंगांचे पंख घेऊन इंद्रधनु आकाशात उडत असते.खरं म्हणजे पावसाचे सारे रंग इंद्रधनु दाखवतोच कुठे ? पावसाला सहस्त्र रंग असतात किंवा त्याहून अधिक.तर अशा रंगबहार पावसाला शब्दांत रंगवणं मराठी साहित्यातल्या दिग्गजांनाच जमलंय.तर असा हा रंगबहार पाऊस जेव्हा येतो तेव्हा अशा लक्षावधी रंगांनी भरलेल्या पावसात चिंब व्हा.

## - अतिथी संपादकाची ओळख -



मी वैभव पुरुषोत्तम भागवत.मी MCA करतो आहे.लेखनाचं म्हणाल तर मी तसं काही लिहलेलं मला आठवत नाही.हो,पण एक प्रेमपत्र जरुर लिहलं होतं.ते जिच्यासाठी होतं तिला ते देण्यापूर्वीच आईच्या हाती लागलं आणि आई म्हणाली,छान लिहतोस.म्हणून मी जेव्हा लिहणार तेव्हा या २ महिलांचा त्यात हात असेल.पहिली म्हणजे 'ती' आणि दूसरी म्हणजे 'आई'.यात तिसरीचा हात लवकरच यावा आणि ती माझी बहीण वगैरे राहू नये एवढीच मनापासून इच्छा आहे.असो.तर..माझे आवडते साहित्यिक आहेत पु.ल.देशपांडे आणि मराठी कवितांमध्ये कुसुमाग्रजांची असामान्य कल्पकता आणि मंगेश पाडगावकरांची सोप्पी आणि आशावादी रचना मला आवडते.

जगभरात विखुरलेल्या मराठी भाषिकांना कवितांच्या माध्यमातून जोडणारे नेटाक्षरी मी नेहमी वाचत असतो.उच्च दर्जाचे लेखन यात नेहमी वाचायला मिळते.याचं एक कारण म्हणजे नेटाक्षरीचे संपादन स्वप्ना कोल्हे करतात.त्या उत्तम कवयित्री तर आहेतच शिवाय उत्तम समीक्षकही आहेत.त्यांना २००९ सालचा कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा साहित्यभूषण पुरस्कार देखील मिळाला आहे.

सध्या मराठी भाषेतले ई साहित्य पायथ्यावरच आहे.ई साहित्य प्रकाशनाने ई बुक्स प्रकाशनाच्या माध्यमातून दमदार सुरुवात केली आहे.जेव्हा मराठी ई साहित्य एखादे शिखर गाठेल तेव्हा नेटाक्षरीचे स्थान मराठीतल्या मुळाक्षरासारखे अपरिहार्य असेल.

मला अतिथी संपादकाचा बहुमान दिल्याबद्दल नेटाक्षरीचे मनःपूर्वक आभार आणि माझ्या आवडत्या नेटाक्षरीस पुढील वाटचालीसाठी आकाशभर शुभेच्छा..

## * पाऊस *

काळ्या अन सावळ्या असे दोघेजण
आभाळात रहात होते
येता जाता सारखं उगाच
एकमेकांशी भांडत होते

एकदा असेच दोघेजण
आले होते चांगलेच रंगा
तिकडून आले वारा मास्तर
ऐकून दोघांचा भलता दंगा

मग कसे गरजले मास्तर
गडाडगड गडाडगड
हातावर मारली विजेची छडी
कडाडकड कडाडकड

काळ्या सावळ्या दोघेजण
धाय मोकलून रडू लागले
पाऊस म्हणून तेच पाणी
अंगणात आपल्या खेळू लागले

- जान्हवी गोळे ,पुणे



## * पाऊस *

खिडकीवरती टकटक करतो
खुणावतो गं पाऊस

डोळयांमध्ये आठवणींचा
भुरभूर पडतो पाऊस

आसुसलेल्या जमिनीवरती
हवाहवासा पाऊस

गडगड करतो येण्याआधी
धांदल करतो पाऊस

थेंब टपोरे पानांवरती
ठेवून जातो पाऊस

मनात माझ्या चिंब सुखाचा
सुगंध भरतो पाऊस

- तुषार जोशी ,नागपूर



## * पाऊस उसवतो धागे *

पाऊस उसवतो धागे,गोधडी मनाची खुलते
तुकडे सरल्या दिवसांचे,खपली काळाची पडते

आषाढाचे कोसळणे,मी ओसरीत बसलेली
तू शोधत आडोशाला,नजरेला पाणी भिडते
पाऊस उसवतो धागे....

मन श्रावण श्रावण झाले झुलणाऱ्या झोपाळ्यांचे
सावरी धुके स्वप्नांचे जमिनीवर पाऊल नव्हते
पाऊस उसवतो धागे....

तो भाद्रपदाचा चकवा कधी रुसलेला कधी ओला
ओल्याशा आडोशाला पाऊल वाकडे पडते
पाऊस उसवतो धागे....

तो आश्विन पाऊस जेव्हा गडगडला हृदयावरती
वीज घरट्यावरती माझ्या मनी तुझ्या काहीसे घडते
पाऊस उसवतो धागे....

दिन काळोखे हैराण,मळमळत्या रात्री ओल्या
विसरावे सारे सारे पण जखम मनी भळभळते
पाऊस उसवतो धागे....

- स्वरांगी देव,इंदूर



## * टपटप पाऊस *

टपटप पडतोय हा पाऊस
क्षणात मातीत मिसळतोय पाऊस
घराला पडल्यात छोटीशी छिद्र
त्यांच्यातनपण गळतोय हा पाऊस

काय करावं कळंना झालंय
छप्परच आज गळायला लागलंय
घरातल्या वस्तूंना भिजवायला लागलंय
उजेडालातर दरडावून कोपऱ्यातच बसवलंय

पाणी भरायची गरजच नाय
त्यानच समद्म भरुन ठेवलंय
घरातल्या भांड्यांनाच काय
पुस्तकांनापण कवेत घेतलंय
छपरातून टपटप पडणारा पाऊस
मला जरा कमीच जाणवतोय
म्हणून तर डोळयांच्या मार्गातनपण
तो भलताच आज ओघळतोय
कुणाला उचलू,कुणाला नाय
आज सगळेच भारावलेले दिसताहेत
पाण्यावर तरंगून टकमक बघताहेत
एकदाचा बांध काय सुटला
मला तर बोलावणंच धाडलं
निघना घरातून म्या बी बाहेर
घरालाच त्याने पुरात ओढलं

- विशाल ,नवी मुंबई



## * पाऊस पाऊस *

रिमझिम धार
मंद सुवास
मनातला नाद पाऊस पाऊस

चिंब भिजणे
अलवार बिलगणे
एक स्वप्न पाऊस पाऊस

ही थरथर
एक हुंकार
हे मिलन पाऊस पाऊस

नवीन आशा
हा दिलासा
तुझा अंकुर पाऊस पाऊस

- श्वेता देशमुख,ठाणे



* पाऊस कालपासून भलताच पेटलाय *

पाऊस..
ये म्हटल्याने येत नाही,जा म्हटल्याने जात नाही

पाऊस..
माझ्याशी असाच तुसड्यासारखा वागतो
मी रेनकोट घरी ठेवला की
हात धुऊन मागे लागतो

पाऊस..
मी हज्जारदा बजावलं तरी
मी नसतांना तिला एकटीला गाठतो
तिच्या छत्रीतून लगट करतो
काल असाच त्यानं मुक्काम थाटला
धुसमुसळेपणानं तिला खेटला

वाटलं,आता हिचा तोल जाणार
ही गरम होणार..हिला ताप येणार

पण झालं भलतंच !
पाऊस..जेव्हा तिच्या उष्ण श्वासांना भेटलाय
पाऊस कालपासून भलताच पेटलाय

मी दोष कुणाला देणार ?
चूक माझीही नसते,तशीच त्याची ही नाही
आणि ती तर नेहमीप्रमाणेच नामानिराळी..अ

- रमेश ठोंबरे



## * पाऊस असा कोसळतो *

पाऊस असा कोसळतो
एकांती जीव जळतो
रंग धुंद धुंद
गंध कुंद कुंद
एकांती जीव तडफडतो
पाऊस असा कोसळतो, एकांती जीव जळतो
घन गडाड गड
वीज कडाड कड
गंधार नभी घुमतो
अंधार चिंब डसतो
कोसळतो
पाऊस असा कोसळतो, एकांती जीव जळतो
तन चूर चूर
मन पूर पूर
विरह उरी चुभतो
शृंगार उगी पाहतो
कोसळतो
पाऊस असा कोसळतो, एकांती जीव जळतो
वाट पाही पाही
साथ नाही नाही
सरण हे रचतो
मरण रे मागतो
कोसळतो
पाऊस असा कोसळतो, एकांती जीव जळतो

- स्वप्ना कोल्हे ,नाशिक



## * पाऊस नसतोच कधी *

पाऊस नसतोच कधी वेडापिसा
वेडे असतोत आपण
आपणच करीत असतो त्यावर
आपल्या स्वप्नांची पखरण
पाऊस नसतोच कधी आपला,आपल्यासाठी
आपणच दिवाणे असतो पावसाचे
म्हणूनच त्याच्या भरुन येण्याला आपण
मानू लागतो फळ आपल्याच नवसाचे
पाऊस नसतोच कधी
आभाळभर गरजणारा मातीभर पसरणारा
तो असतो फक्त एक मोर
स्वतःच्याच धुंदीत पिसारा फुलवून रानभर नाचणारा
पाऊस नसतोच कधी आपला मित्र वगैरे
गृहित धरतो त्याला उगाचच आपण
आणि करीत जातो त्याच्या भोवती
आपल्या भावबंधांची गुंफण
पाऊस नसतोच कधी डोळयांतून बरसणारा
आपल्यालाच असते सवय अतिशयोक्ती करण्याची
नाहीतर आभाळाला तरी काय गरज होती
असं आतून गहिवरुन येण्याची ?
खरंतर..
खरंतर पाऊस नसतोच कधी खरा पाऊस
ते असतं फक्त आपलं म्हणणं
नाहीतर..नाहीतर त्याला तरी कुठे मान्य आहे
असं जीव तोडून बरसणं ?

- स्वप्निल व्यास,सांगली



रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन काव्य पुरविण्याचा
ई-साहित्य प्रकाशनाचा ध्यास 'नेटाक्षरी' जोमाने पार पाडत आहे. दर आठवड्यात मिळणाऱ्या तुमच्या प्रतिसादांनी
आमचा उत्साह द्विगुणीत होतोय.नेटाक्षरी हा साप्ताहिक अंक सध्या सुमारे
६0000 मराठी रसिकांना विनामूल्य वितरीत केला जातो.
त्या व्यतिरिक्त संकेतस्थळाला भेट देऊन वाचणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे.
हा अंक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड करण्यास आमची काही हरकत नाही परंतु असे करताना आमच्या
आयडीचा अंतर्भाव केल्यास आम्ही आभारी राहू. मराठी कवितेची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लाभावा
हीच इच्छा. आपल्यासारख्या रसिकांच्या सहाय्याने हा अंक लवकरच
एक लक्ष वाचकांपर्यंत नियमित पोहचवण्याचा
आमचा संकल्प सिध्दीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

**– ई साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामुल्य ई साप्ताहिके –**

स्वरनेटाक्षरी ऑडिओ अल्बम , बाल नेटाक्षरी , ई श्टाप

**– प्रसिध्द झालेली ई बुक्स –**

टल्लीची शाळा,मकरंदच्या त्रिवेण्या,ग्रेव्हयार्ड लिटरेचर,चार क्षण,
तो आणि ती,प्रियेचे अभंग,देशी दारुचे दुकान, ई शाळा ,
तो , मी आणि सिगरेट

आमची ई बुक्स विनामूल्य मिळण्यासाठी - esahitya@gmail.com

हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी - netaksharee@gmail.com